सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
Maharashtra State Commission For Women

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

क्रमांक : ममआ/2019/ स-पात/का-3/103
दिनांक :- 24/05/2019

प्रति,
अधिष्ठाता,
नायर रुग्णालय,
मुंबई.

विषय :- **डॉ. पायल तडवी (एम. डी) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थीनीची रॅगिंगला कंटाळून केलेल्या आत्महत्येबाबत.**

महोदया,

आपल्या रुग्णालयातील शिकाऊ डॉ. पायल तडवी (एम.डी.) यांनी रॅगिंगच्या छळाला कंटाळून दि. 22/05/2019 रोजी नायर रुग्णालयाच्या वसतिगृहात आत्महत्या केल्याची बातमी विविध माध्यमांद्वारे प्रसिध्द झाली आहे. सदर प्रकरण हे अतिशय गंभीर स्वरुपाचे असून आयोगाने महाराष्ट्र राज्य आयोग कायदा 1993 कलम 10(फ) 1 अन्वये प्रकरणाची स्वाधिकारे दखल घेतली आहे.

आपल्या रुग्णालयाला व त्याला संलग्न असलेल्या महाविदयालयांमध्ये रॅगिंगविरोधी कायदयाची अंमलबजावणी होते का ? आणि विदयार्थी व वरिष्ठ अधिकारी यांच्यामध्ये सुसंवाद नसणे, हे दोन मुद्दे या निमित्ताने पुढे आलेले आहेत. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. तसेच यापुढे आपण रॅगिंगविरोधी कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही करणार आहात याचाही सविस्तर अहवाल, 8 दिवसाच्या आत महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा, 1993 12 (2) व 12 (3) नुसार आयोग कार्यालयास तात्काळ पाठवावा.

मा. अध्यक्षांच्या निर्देशानुसार,

(डॉ. मंजुषा मोळवणे)
सदस्य सचिव (अ.का.)